संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




• वर्ष : ७ वे • • अंक : ६६ वा • • बुधवार दि. ४ ऑक्टोबर २०२३ • • किंमत २ रु • पाने : ४ • RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# जिल्ह्यातील ९४ ग्रामपंचायतींसाठी ५ नोव्हेंबरला मतदान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** राज्य निवडणूक आयोगाने जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकांसाठी संगणकप्रणालीव्दारे तसेच ग्रामपंचायतीतील रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये सांगली जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या ९४ आहे. तर सदस्य पदाच्या २९ व सरपंच पदाच्या ३ अशा एकूण ३२ रिक्त जागांसाठी पोट निवडणूक असलेल्या ग्रामपंचायती २६ आहेत.



निवडणूका असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आजपासून आचारसंहिता लागू झाली असून ती निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत लागू राहील. नामनिर्देशनपत्रे १६ ते २० ऑक्टोबर २०२३ या कालावधीत दाखल करता येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी २३ ऑक्टोबर २०२३ रोजी होईल. नामनिर्देशनपत्रे २५ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मागे घेता येतील. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. ५ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी ६ नोव्हेंबर २०२३ रोजी होईल.

**आटपाडी तालुक्यातील या ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर**

सार्वत्रिक निवडणूक आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केलेल्या आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी, वाक्षेवाडी, काळेवाडी, मानेवाडी, मासाळवाडी, मिटकी, पिंपरी खुर्द, आंबेवाडी, बनपुरी, करगणी, मुढेवाडी, निंबवडे, पूजारवाडी आ., विभूतवाडी, औटेवाडी, कानकात्रेवाडी, चिंचाळे या गावाच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत.

# २०२४ ला गोपीचंद पडळकरच आमदार : राजेंद्रअण्णा देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** खानापूर मतदारसंघाचा २०२४ चा विधानसभेचा आमदार गोपीचंद पडळकर हेच आहेत, हे लक्षात ठेवून दसर्यानंतर कामाला लागायचे आहे, अशा शब्दांत माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख यांनी गोपीचंद पडळकर यांना शुभेच्छा देत, गोपीचंद पडळकर यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले.

आमदार गोपीचंद पडळकर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण खानापूर मतदारसंघामध्ये यानिमित्त विविध उपक्रम पार पडले. यामध्ये रविवारी रात्री उशिरा आटपाडीच्या देशमुख वाड्यात झालेला



गोपीचंद पडळकर



राजेंद्रआण्णा देशमुख

पडळकर यांचा सत्कार करण्यात आला. तर दहीहंडी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी आमदार देशमुख यांनी भाषण केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, आपण एवढेच लक्षात ठेवून दसर्यानंतर पूर्ण तालुक्यामध्ये आणि मतदारसंघामध्ये कामाला लागायचे आहे. आटपाडीच्या देशमुख वाड्याच्या एकूणच भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कारण माजी आमदार देशमुख यांचे धाकटे बंधू अमरसिंह देशमुख हे भाजपचे मतदार संघाचे निवडणूक प्रमुख आहेत. तसेच गेल्या काही दिवसांपासून ते शिवसेना शिंदे गटाचे आमदार अनिल बाबर यांच्याबरोबर विविध कार्यक्रमांत एकत्र दिसत आहेत.

असे असताना राजेंद्रअण्णा देशमुख यांच्या या भूमिकेमुळे महायुतीअंतर्गत नेमके काय चालले आहे, असा प्रश्न सामान्यांना पडला असतानाच, ही महायुतीतील धुसफूस आहे का? आगामी बदलत्या काही राजकारणाच्या वेगळ्या समीकरणाची नांदी तर नव्हे ना? याची चर्चा संपूर्ण खानापूर मतदार संघात रंगली असली तरी, राजेंद्रअण्णा देशमुख यांच्या भाषणामुळे सध्या पडळकर गटात मात्र आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# नांदेड येथील घटनेची चौकशीअंती दोषींवर कारवाई करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात झालेल्या घटनेची शासनाने गंभीर दखल घेतली असून या घटनेची चौकशी करुन त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मंत्रालय येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, याबाबतीत प्राथमिक माहिती घेतली असता लक्षात आले की, रुग्णालयात औषधांची कमतरता नव्हती. रुग्णालयात पुरेशी औषधे होती. तिथे पुरेसे डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची उपलब्धता आहे. यानंतरही अशा प्रकारची घटना घडल्याने ही गंभीर बाब आहे. त्यामुळे नांदेड येथे झालेल्या मृत्यूंची चौकशी होईल. यात कोणी दोषी आढळला, तर त्याच्यावर कारवाई केली जाईल.

# छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे भारतात आणण्यासाठी करार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धकालीन शस्त्र असलेली ही वाघनखे ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम मधून भारतात परत आणण्याबाबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार लंडनला गेले आहेत. दि. ३ ऑक्टोबर,२०२३ रोजी व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम येथे भेट देऊन या संग्रहालयाचे संचालक ट्रायस्टम हंट यांच्यासोबत या करारावर स्वाक्षरी होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षात वाघनखे शिवप्रेमींच्या दर्शनाला भारतात आणण्याच्या दृष्टीने सांमजस्य करार करण्यास लंडन येथे जाताना खूप अभिमान वाटतो आहे, असे भावोद्गार मंत्री श्री.मुनगंटीवार यांनी यावेळी काढले. यावेळी आमदार पराग अळवणी, ओमप्रकाश चव्हाण, अमोल जाधव, विनीत गोरे, स्थानिक नगरसेविका उपस्थित होते.

मंत्री श्री.मुनगंटीवार म्हणाले, ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती देत हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज यांना अपेक्षित रयतेचे राज्य महाराष्ट्राला देण्याचा संकल्प करुन काम करीत असल्याचे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहे, आमची प्रेरणा आहे त्यांच्या विचारसरणीला धरून केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार काम करीत आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

दि. १५ एप्रिल, २०२३ रोजी मुंबई येथे ब्रिटेनचे पश्चिम भारत उपउच्चायुक्त अँलेन गँमेल यांच्यासह ब्रिटनच्या राजकीय व द्विपक्षीय सबंध उपप्रमुख श्रीमती इमोगेन स्टोन यांच्यासोबत बैठक घेऊन महाराष्ट्र शासनाने व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी पत्रव्यवहार सुरू केला होता.

# राज्यातील रोहयोची मंजूर कामे तातडीने सुरू करा : संदिपान भुमरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



संदीपन भुमरे

**मुंबई :** राज्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेली कामे तत्काळ सुरू करण्यात यावीत, असे निर्देश रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी दिले. मंत्री श्री. भुमरे यांच्या शासकीय निवासस्थानी रोजगार हमी योजनेच्या विविध उपक्रमांच्या अंमलबजावणी विषयी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, उपसचिव संजना खोपडे उपस्थित होते.

मंत्री श्री. भुमरे म्हणाले की, राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे मंजूर करण्यात आली आहेत. काही भागात पाऊस असल्याने कामांना सुरुवात झाली नसेल, तर ती कामे तत्काळ सुरू करण्यात यावीत. ज्या ठिकाणी काही समस्या निर्माण होत आहेत त्यांनी शासनाकडे तत्काळ मार्गदर्शन मागवावे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील मंजूर कामे पुढील आठवड्यात सुरु करुन त्याचा अहवाल द्यावा अशीही सूचना मंत्री श्री भुमरे यांनी केली. यावेळी नाशिक जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा पडोळ, गट विकास अधिकारी नम्रता जगताप यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# सभासदांना डिजीटल सेवा देण्यावर संस्थेचा भर

## राहुल सपाटे : चौंडेश्वरी पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** सभासदांना जास्तीत-जास्त डिजीटल सेवा देणेवर संस्थेचा भर असून सभासदांना घरी बसून सर्व व्यवहार करता येतील असे नियोजन चालू आहे. तसेच संस्थेचे सर्व सभासद, सर्व पदाधिकारी, सेवक, बचत प्रतीनिधी यांचे सहकार्याने संस्था प्रगतीपथावर असून सर्वांचे सहकार्याने हे यश शक्य झाल्याचे प्रतिपादन चौंडेश्वरी पतसंस्थेचे संस्थेचे चेअरमन राहूल सपाटे यांनी व्यक्त केले.

चौंडेश्वरी पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न संस्थेचे चेअरमन राहूल सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक कै.मधुकर दौंडे (दादा) यांचे प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्लन



**आटपाडी : येथे चौंडेश्वरी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित कुटुंबप्रमुख चंद्रकांत दौंडे, चेअरमन राहुल सपाटे, राजेंद्र दौंडे, बालक डोईफोडे व उपस्थित मान्यवर**

संस्थेचे सभासद विकास भुते व संस्थेचे पदाधिकारी यांचे हस्ते करणेत आले. संस्थेच्या वतीने दिवंगत जवान, सभासद, ग्राहक, थोर नेते, शास्त्रज्ञ यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या सभेस संस्थेचे कुटूब प्रमुख चंद्रकांत दौंडे, व्हा.चेअरमन योगेश संचालक, मच्छिंद्र खंडागळे, अजित कलढोणे, सोनराज ऐवळे, विकी दिवटे, संस्थेचे माजी चेअरमन राजेंद्र प्रल्हाद दोंडे, माजी व्हा.चेअरमन उत्तम कवडे संस्थेचे सभासद प्रसाद दिक्षीत, विकास भुते, सुधाकर जाधव, सुधिर लाटणे यांच्यासह संस्थेचे सर्व सेवक, बचत प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रास्ताविक संस्थेचे वसुली अधिकारी तानाजी जाधव यांनी केले. यावेळी मागील सभेचे वृतांत, अहवाल वाचन, आर्थिक पत्रके, लेखापरिक्षण अहवाल वाचन संस्थेचे सचिव बालक डोईफोडे यांनी केले. या सभेते विषय पत्रिकेप्रमाणे सर्व विषयावर चर्चा होऊन सभासदांनी विचारलेल्या सर्व प्रशांना संस्थेचे कुटूब प्रमुख चंद्रकांत दोंडे व संस्थेचे चेअरमन राहूल सपाटे यांनी उत्तरे दिली.

आपली संस्था आटपाडी तालुक्यामध्ये आर्थिक प्रगतीनुसार नंबर एक असल्याने संचालक मंडळाचा आभिनंदाचा ठराव संस्थेचे सभासद प्रसाद दिक्षीत यांनी मांडला. त्यास सभासदांनी टाळ्या वाजवून मान्याता दिली. या सभेत प्रसाद दिक्षीत, विकास भुते, सुधाकर जाधव यांनी मांडलेल्या सर्व विषयावर संचालक मंडळाणे विचार करूण योग्य तो निर्णय घेणेचे मान्य केले.

**चौंडेश्वरी पतसंस्थेची दिनांक ३१/०३/२०२३ ची आर्थिक स्थिती**

- * सभासद–२३०४
- * भागभांडवल–१ कोटी ७० लाख
- * निव्वळ नफा–५८ लाख ४२ हजार
- * स्वनिधी–३ कोटी ६६ लाख
- * ठेवी–१७ कोटी ५४ लाख
- * कर्ज वाटप–१३ कोटी ४४ लाख
- * गुंतवणूक–८ कोटी ४४ लाख
- * खेळते भांडवल–२२ कोटी ९६ लाख
- * लेखापरिक्षण वर्ग–अ
- * लाभांश वाटप–८ टक्के
- *प्रतीसेवक व्यवसाय–४कोटी ४२लाख
- * निव्वळ एन.पी.ए.–२.६३ टक्के

तसेच संस्थेच्या आर्थिक प्रगती बरोबर कमी खर्चात योग्य ती डिजीटल सेवा देणेसाठी व सभासदाना घरपोच सेवा देणेचे धोरण संस्थेने स्विकारले आहे.

# अंबादास वाजे यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



अंबादास वाजे

**आटपाडी :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष अंबादास वाजे यांचे आज पहाटे २.३० वाजता हृदयविकराच्या तीव्र झटक्याने अचानक निधन झाले. संपूर्ण महाराष्ट्रतील शिक्षकांना न्याय देण्यासाठी सदैव धडपडणारा एक तारा निखळला. अंबादास वाजे यांनी शासन दरबारी धाक ठेवणारा संघाचा शिलेदार म्हणून त्यांच्याकडे पहिले जात होते. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा सांगली कडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.




# कार्बन न्युट्रलिटी सुविधा कक्षाची स्थापना

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते पुणे आंतरराष्ट्रीय संस्थेच्या पर्यावरण विभागाच्या सहकार्याने विभागीय आयुक्त कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेल्या कार्बन न्युट्रलिटी सुविधा कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, पुणे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, सोलापूरचे जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आवळे, पुणे आंतरराष्ट्रीय संस्थेचे पर्यावरण विभाग प्रमुख प्रा.अमितव मल्लीक, पुणे महानगरविकास प्रदेश प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पीएमपीएमएल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

श्री. राव म्हणाले, अतिरिक्त कार्बन उत्सर्जनामुळे अत्यंत गंभीर स्वरूपाच्या पर्यावरणीय हानीपासून पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. कार्बन न्युट्रलिटी सुविधा कक्ष काळाची गरज असल्यामुळे स्वयंस्फूर्तीने हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या माध्यमातून कार्बनचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. कार्बन स्थिरीकरणाच्या महत्वाविषयी जनजागृती करणे, हा या कक्ष स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. पुणे महानगरविकास प्रदेश प्राधिकरणाच्या हद्दीपासून या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात केली जाणार असून हा प्रकल्प यापुढे कार्बन स्थिरीकरणासाठी संपूर्ण पुणे विभागात राबविण्यात येणार असल्याचेही श्री. राव म्हणाले. या कक्षाचे सनियंत्रण सहआयुक्त पूनम मेहता आणि उपायुक्त विजय मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद प्रशासन विभाग येथून करण्यात येणार आहे.

# दिवाळीनिमित्त शंभर रुपयांत आनंदाचा शिधा

## मैदा, पोह्याचा देखील समावेश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचा देखील समावेश करण्यात आला आहे.

पूर्वी आनंदाचा शिधा या संचात रवा, चनाडाळ, साखर आणि खाद्यतेल असे ४ जिन्नस होते. मात्र,आता यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शेतकरी अशा १ कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल.

यामध्ये १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा राहील. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

# संपादकिय

## जातनिहाय सर्वेक्षणातून नव्या राष्ट्रीय राजकारणाची नांदी?

बिहार सरकारने विधिमंडळात ठराव करून राज्यात जातनिहाय सर्वेक्षण केले. या अहवालानुसार, राज्यात ओबीसींची संख्या ६३.१४ टक्के आहे. त्यात ३६.१ टक्के अतिमागास, २७.१ टक्के मागास आहेत. राज्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या १९.७ टक्के, तर अनुसूचित जमातींची १.७ टक्के आहे. या अहवालानुसार, राज्यात १५.५ टक्के सवर्ण आहेत. ओबीसींमध्ये राजकीयदृष्ट्या प्रभावी यादव समाजाची संख्या सर्वाधिक १४.२६ टक्के आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विविध योजना राबविण्यात हा अहवाल महत्त्वपूर्ण ठरेल, असा दावा बिहार सरकारने केला आहे. मंडल आयोगाच्या अहवालानुसार, देशात सरासरी ५२ टक्के ओबीसी आहेत. मात्र, बिहारमधील ओबीसींची संख्या राष्ट्रीय सरासरीपेक्षाही जास्त असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे जातनिहाय जनगणनेच्या विरोधकांच्या मागणीला बळ मिळाले आहे. देशात दर दहा वर्षांनी जनगणना होते. मात्र, १९३१ नंतर जातनिहाय जनगणना झालेली नाही. काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २०११ मध्ये जनगणनेबरोबर सामाजिक -आर्थिक सर्वेक्षण केले होते. मात्र, त्याचाही तपशील अद्याप उपलब्ध करून झालेला नाही. हा तपशील जाहीर करण्याबरोबरच २०२१ ची प्रलंबित जनगणना जातनिहाय करावी, अशी मागणी जोरकसपणे पुढे आली आहे.

विशेषत: काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी ही मागणी आक्रमकपणे लावून धरल्याचे दिसते. संसदेत महिला आरक्षण विधेयकावरील चर्चेतही त्यांनी ओबीसी महिलांच्या आरक्षणाचा समावेश करण्याबरोबरच जातनिहाय जनगणनेची मागणी केली होती. दर दहा वर्षांनी जातनिहाय जनगणनेचा मुद्दा चर्चेत येतो. मात्र, यावेळी आगामी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका आणि लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांची 'इंडिया' आघाडी ही मागणी रेटून भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न करेल, असे चित्र दिसते. 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी', अशी बसपचे संस्थापक कांशीराम यांची घोषणा प्रसिद्ध होती. बिहारच्या अहवालाने या घोषणेला बळकटी मिळाल्याचे दिसते.

भाजपप्रणीत केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेची मागणी आधीच फेटाळली आहे. जनगणनेमध्ये अनुसूचित जाती -जमाती वगळता इतर कोणत्याही जातींच्या लोकसंख्येची गणना केली जाणार नाही, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे, असे केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी जुलै २०२१ मध्ये लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले होते. त्याआधी मार्च २०२१ मध्ये त्यांनी राज्यसभेतही हीच भूमिका मांडली होती. जातनिहाय जनगणनेच्या मागणीबाबत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी मध्यंतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. मात्र, पंतप्रधानांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला नव्हता. जातनिहाय जनगणनेबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सध्या भूमिका मांडली नसली तरी या मागणीला संघाचा विरोध असल्याचे दिसते. जातनिहाय जनगणनेची मागणी ही जातीमुक्त समाजाच्या संकल्पनेविरोधात असून, सामाजिक सलोख्याच्या प्रयत्नात बाधा निर्माण होईल, असा दावा संघाच्या एका पदाधिकाऱ्याने काही वर्षांपूर्वी केला होता.

सर्वोच्च न्यायालयाने १९९२ मध्ये इंद्रा साहनी खटल्यात आरक्षणाची मर्यादा ५० टक्के इतकी निश्चित केली होती. ती ओलांडण्याची मागणी वारंवार होत होती. आता जातनिहाय जनगणनेच्या निमित्ताने या मागणीला बळ मिळाले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाला १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवला. त्याद्वारे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली. मात्र, ही मर्यादा मागासवर्गीय आरक्षणासाठी लागू असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल हा पूर्णतः वेगळा समाजघटक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते. मात्र, जातीनिहाय जनगणना झाल्यास सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर या मर्यादा ओलांडण्याची मागणी जोरकसपणे मांडली जाईल, अशी चिन्हे आहेत.

ओबीसी समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी २०१७ मध्ये न्यायमूर्ती रोहिणी यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला होता. देशातील सुमारे २६०० ओबीसी जातींपैकी काही मोजक्या जातींना आरक्षणाचा लाभ मिळाला असून, ओबीसींमधील अतिमागास जातींच्या विकासाचा आढावा घेणारा अहवाल रोहिणी आयोगाने नुकताच सादर केला. मात्र, तो केंद्र सरकारने अद्याप प्रसिद्ध केलेला नाही. या अहवालाच्या आधारे ओबीसी जातींची तीन-चार गटांत विभागणी करून त्यांना आरक्षणाचा, तसेच सरकारी योजनांचा लाभ दिला जाऊ शकतो. मंडल आयोगानंतर राजकीय मैदानात वर्चस्व निर्माण करणाऱ्या ओबीसींमधील प्रबळ जातींविरोधात भाजपने अतिमागास समाजघटकांना बळ देण्याचा प्रयत्न केला. मात्र, ओबीसींची वर्गवारी करून या समाजातील प्रस्थापित जातींना दुखावण्याची जोखीम भाजप घेईल का, हा प्रश्न आहे. शिवाय, जातींच्या आधारे विरोधक समाजात फूट पाडत असल्याचा भाजपचा आरोप या अहवालामुळे अंगलट येऊ शकतो. त्यामुळे जातनिहाय जनगणनेद्वारे भाजपच्या हिंदुत्वाच्या राजकारणाला शह देण्याचा विरोधकांचा प्रयत्न आणि तो हाणून पाडण्याच्या भाजपच्या हालचाली, अशा संघर्षात राष्ट्रीय राजकारण कूस बदलण्याचे संकेत आहेत.




# विविध देशांचा 'वर्ल्ड ट्रेड एक्स्पो' मध्ये सहभाग

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जी - २० शिखर परिषदेच्या यशानंतर भारताचे जागतिक पटलावर महत्व अधोरेखित झाले आहे. विविध देश आज व्यापार विस्तारासाठी चीनला समर्थ पर्याय म्हणून भारताकडे पाहत आहेत. युवा लोकसंख्येच्या रुपाने भारताला आणखी एक लाभांश मिळाला आहे. या महत्वाच्या वेळी आयोजित करण्यात आलेले जागतिक व्यापार प्रदर्शन विविध देशांमध्ये व्यापार सहकार्य व विकास वाढविण्याच्या दृष्टीने मैत्रीपूर्ण पुलाचे कार्य करेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.



मुंबई : मुंबईत जागतिक व्यापार प्रदर्शनाचे उदघाटन करताना राज्यपाल रमेश बैस

राज्यपाल श्री. बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील जागतिक व्यापार केंद्र येथे मंगळवारी (दि. ३) दोन दिवसांच्या चौथ्या जागतिक व्यापार प्रदर्शनाचे उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते. वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई व ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज तर्फे जागतिक व्यापार प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

व्यापार, तंत्रज्ञान व पर्यटन' या विषयावर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.आज पर्यटन हा जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक झाला आहे. गेल्या वर्षी एकट्या भारतातून १.८० कोटी पर्यटक विविध देशांत गेले व ६१ लाख विदेशी पर्यटक भारतात आले. देशांतर्गत १७.३१ कोटी पर्यटकांनीदेखील पर्यटनाला चालना दिली.

महाराष्ट्र उद्योग व गुंतवणुकीच्या दृष्टीने सर्वांत आकर्षक राज्य असून राज्यात पर्यटन विकासाच्या अनेक संधी आहेत. वर्ल्ड ट्रेड एक्स्पोच्या माध्यमातून विविध देशांना आपल्या देशातील व्यापार, गुंतवणूक व पर्यटनाच्या संधी दाखविण्याची तसेच राज्यातील व्यापाराच्या शक्यता जाणून घेण्याची संधी मिळेल, असे राज्यपालांनी सांगितले.

व्यापार प्रदर्शनात सहभागी सर्व देशांनी महाराष्ट्राशी सहकार्य वाढवावे व इतर क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवनवी क्षितिजे शोधावीत अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

३० देशांचा सहभाग

जागतिक व्यापार प्रदर्शनात ३० देशांचा सहभाग असून देशातील पाच राज्ये देखील यात सहभागी होत असल्याची माहिती, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे व मुंबईच्या जागतिक व्यापार केंद्राचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री यांनी यावेळी दिली. 'वर्ल्ड ट्रेड एक्स्पो'मध्ये व्यापार - व्यापार सहकार्य व व्यापार - शासन सहकार्य या विषयावर बैठक -सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. जागतिक व्यापार केंद्राच्या वतीने कौशल्य प्रशिक्षण केंद्र देखील चालविण्यात येत असून अनेक महिलांना मोफत कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला प्रयागराजच्या खासदार रिटा बहुगुणा-जोशी, ब्रिटनचे मुंबईतील उप उच्चायुक्त हरजिंदर कांग, जागतिक व्यापार केंद्राचे उपाध्यक्ष कॅप्टन सोमेश बत्रा, केंद्राच्या कार्यकारी संचालक रुपा नाईक, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत तसेच उद्योग व व्यापार प्रतिनिधी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री फसल बिमा योजनेंतर्गत फळपिक विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** प्रधानमंत्री फसल बिमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना, (अंबिया बहार) २०२३-२४ या योजनेची अंमलबजावणी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई मार्फत जिल्ह्यात करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत, अंबिया बहार मध्ये कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी यांना विमा बँकाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत पिक निहाय, द्राक्ष(ब) फळपिकासाठी १५ ऑक्टोबर २०२३, केळी फळपिकासाठी ३१ ऑक्टोबर २०२३, आंबा (क) फळपिकासाठी ३१ डिसेंबर २०२३, आणि डाळींब फळपिकासाठी १४ जानेवारी २०२४ अशी आहे. या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार यांनी केले आहे.




या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. ही योजना शासन निर्णयातील अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी लागू राहील. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी ऐच्छिक आहे. अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी खातेदारां व्यातिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत.

जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ घेता यावा यासाठी जमीन भूधारणेच्या मर्यादेत एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त अधिसूचित फळपिकासाठी ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करता येईल. अधिसूचित फळपिकांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा अंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच हंगामाकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल (उदा. डाळींब व द्राक्ष). केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहाणार आहे. उत्पादनक्षम अधिसूचित वय डाळींब व द्राक्ष २ वर्ष, आंबा ५ वर्ष या पेक्षा कमी वयाच्या फळबाग लागवडीस विमा संरक्षण घेतल्याचे निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल. या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने त्यांचा विमा हप्ता ३० टक्के दरापर्यंत मर्यादित केलेला आहे. त्यामुळे ३० टक्के वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी स्विकारणे क्रमप्राप्त आहे. या योजनेंतर्गत ३० ते ३५ टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा हप्ता दायित्व राज्य शासनाने स्विकारले असून ३५ टक्केवरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी ५०:५० टक्के प्रमाणे भरावयाचा आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी नजिकच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. कुंभार यांनी केले आहे.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm ९०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत तालुकानिहाय शिबीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** शिकाऊ व पक्की अनुज्ञप्तीच्या कामाकाजासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ऑक्टोंबर महिन्यात तालुकानिहाय शिबीर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिली.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ऑक्टोंबर २०२३ या महिन्यामध्ये आयोजित तालुकानिहाय शिबीर कार्यक्रम पुढीलप्रमाणे. इस्लामपूर ९ व २३ ऑक्टोबर, विटा ५ व १८ ऑक्टोबर, कडेगाव १७ ऑक्टोबर, पलूस १२ ऑक्टोबर, आष्टा ३, १६ व ३० ऑक्टोबर, आटपाडी ६ व १९ ऑक्टोबर, जत ११ व २५ ऑक्टोबर, शिराळा ४ ऑक्टोबर, तासगाव १० व ३१ ऑक्टोबर, कवठेमहांकाळ २६ ऑक्टोबर २०२३.

# बिबट्याच्या कातड्यासह गवा, भेकर, हरिणाची शिंगे हस्तगत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** पुण्याच्या खडकवासला परिसरातील बिबट्याच्या शिकारप्रकरणी वन विभागाने कराड शेजारील ओगलेवाडी-हजारमाची येथे संशयिताच्या घरावर टाकलेल्या छाप्यात बिबट्याचे कातडे, गवा, भेकर, हरिण यांची शिंगे यासह अन्य साहित्य मिळून आले. पुण्याच्या भांबुर्डीचे वनक्षेत्रपाल प्रदीप संपकाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली. अभिजित जाधव व विश्वजित जाधव यांच्या घरावर टाकलेल्या छाप्याची माहिती वनाधिकाऱ्यांनी दिली.

बिबट्याचे कातडे, गवा, भेकर, हरिण यांची शिंगे हे वन्यजीव अवयव तपासण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले. पुण्याच्या खडकवासला धरणालगतच्या मांडवी बुद्रुक येथील फार्म हाऊसमध्ये बिबट्याचे अवयव लपवून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला होता. यावर वन विभागाच्या छाप्यात बिबट्याच्या नख्या, पंजे असे अवयव हस्तगत करण्यात आले होते. या प्रकरणी विश्वजित जाधव आणि अभिजीत जाधव (दोघेही सध्या रा. डेक्कन जिमखाना, पुणे) यांच्याविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दोघांचे मुळगाव ओगलेवाडी- हजारमाची (ता. कराड) हे असल्याने वनक्षेत्रपाल प्रदीप संकपाळ यांच्या पथकाने येथील जाधव यांच्या घरावर छापा मारला असता बिबट्याचे कातडे, गवा, भेकर, हरिण यांची शिंगे यासह अन्य संशयित साहित्य मिळून आले. मिळून आलेल्या वन्यप्राण्यांच्या अवयवांचा विचार करता बिबट्या, गवा, भेकर, हरिण यांची शिकार झाल्याचे स्पष्ट होत आहे. तर, वन्यप्राण्यांच्या शिकारीचे आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

माणदेश एक्सप्रेस






# महात्मा गांधी यांचा अहिंसेचा मंत्र जगाने स्वीकारला : सुधीर मुनगंटीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**लंडन :** महात्मा गांधींनी दिलेला अहिंसेचा मंत्र जगाने स्वीकारला आहे, असे उद्गार सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लंडन काढले. आज गांधी जयंतीनिमित्त (२ ऑक्टो.) लंडन येथील अव्हॉस्टिक चौकातील महात्मा गांधींच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाच्या भूमीत जन्मलेल्या आणि जगाला अहिंसेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेने जगात सर्वत्र साजरी केली जाते; आपण सर्वच महात्मा गांधी यांच्या भूमीतून आलो आहोत, याचा अभिमान असल्याचे सांगूनमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी भारतरत्न माजी प्रधानमंत्री दिवंगत लालबहादूर शास्त्री यांनाही जयंतीनिमित्त भावांजली अर्पण केली.



**लंडन : येथे महात्मा गांधी यांच्या जयंती कार्यक्रमास उपस्थित वनमंत्री सुधीर मुनगंटीवार व मान्यवर**

श्री. मुनगंटीवार म्हणाले की,लंडनमध्ये महात्मा गांधींना अभिवादन करण्याची संधी मला मिळाली, याचा आनंद वाटतो. महात्मा गांधी यांनी स्वावलंबनाचा मंत्र सर्व जगाला दिला. चरखा हे स्वावलंबनाचे माध्यम म्हणून समाजाला दिले. ज्या वर्धा येथील सेवाग्राम आश्रमातून १९३० ते १९४८ या काळात वास्तव्यास राहून संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेश दिला, त्या सेवाग्राम येथे पालकमंत्री म्हणून काम करण्याची संधी आपल्याला मिळाली व जगातील सर्वात मोठा चरखा उभारण्याचे भाग्य आपल्याला प्राप्त झाल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. अहिंसेचे आयुध म्हणून महात्मा गांधींनी चरख्याचा उपयोग केला. प्रेमाचा संदेश देत ज्योत से ज्योत जलाते रहो या भावनेने त्यांनी जियो और जिने दो ही भावना प्रत्येकात रुजविण्याचा जीवनभर प्रयत्न केला.

लंडन येथे महात्मा गांधी यांच्या जयंती कार्यक्रमास उपस्थित राहून आपल्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली हे मी स्वत:चे भाग्य समजतो, असेही मंत्री श्री.मुनगंटीवार म्हणाले.

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, कॅमेडेनच्या उमहापौर समता खातून, स्थानिक डेप्युटी हाय कमिशनर, ब्रिटिश संसदेतील खासदार वीरेंद्र शर्मा, स्थानिक सुरक्षा व लष्कर सल्लागार, स्थानिक भारतीय नागरिक मंडळाचे पदाधिकारी अल्पेश पटेल, सी. बी. पटेल, प्रसिद्ध लेखक अमीश पटेल, महाराष्ट्र पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे यावेळी उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड -२३ सह चार नव्या ग्रंथाचे प्रकाशन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २३ (इंग्रजी) , जनता ३-३, जनता खास अंक १९३३ आणि इंग्रजी खंड २ चा मराठी अनुवाद (भाग १ व २) या नवीन ग्रंथांचे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



**मुंबई : डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड -२३ सह चार नव्या ग्रंथाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपस्थित मान्यवर**

मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या या प्रकाशनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे समितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासह, मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री, समितीचे सदस्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, शिक्षण संचालक डॉ. शैलेश देवळाणकर, सदस्य माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. संभाजी बिरांजे, डॉ. बबन जोगदंड, डॉ. सुरेंद्र धाकतोडे, ज. वि. पवार, योगीराज बागूल, रुपेंद्र मोरे, सिद्धार्थ खरात, आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या कामाचे कौतुक केले. याच कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड ४, खंड १२, खंड १५, खंड १७ (तीन भाग), खंड १८ (तीन भाग), आणि जातीव्यवस्थेचे निर्मूलन या ग्रंथांच्या नव्या आवृत्तींचे प्रकाशन करण्यात आले.

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात माहिती अधिकार दिन साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी, सहायक मोटार वाहन निरीक्षक गजानन कोळी, अश्विनी चव्हाण, धनश्री व्हनखडे, प्रशांत गावडे यांच्या उपस्थितीत माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी माहिती अधिकार कायदा जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहचवण्याचा मानस व्यक्त केला. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांतराव साळी यांनी माहिती अधिकारबद्दल माहिती दिली. गजानन कोळी यांनी माहिती अधिकार कायद्याबद्दल मार्गदर्शन केले. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संपर्कात येणाऱ्या जनतेस या कायद्याबद्दल माहिती देवून माहिती अधिकारात अर्ज कसा करावा याबद्दल प्रत्यक्षपणे माहिती दिली.

# सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया ९ ऑक्टोबर पासून सुरू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या २८ जून २०२३ रोजीच्या आदेशान्वये ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत पुढे ढकलण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ९ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू करण्यात येणार असल्याचे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव वसंत पाटील यांनी कळविले आहे.



निवडणुकांकरीता प्रारूप अथवा अंतिम मतदार याद्या ७ जून २०२३ पर्यंत किंवा त्यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत, त्या टप्प्यापासून सुरू करण्यात येणार आहेत. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता ८ जून ते २१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत प्रारूप अथवा अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकांकरीता १ ऑक्टोबर २०२३ या अर्हता दिनांकावर नव्याने प्रारूप मतदार याद्या तयार करावयाच्या आहेत.

ज्या प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या नाहीत, अशा प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणुकांकरीता प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार अर्हता दिनांकाबाबतचे प्रस्ताव कारणमिमांसा नमूद करून प्राधिकरणास सादर करणे आवश्यक आहे.

संघीय संस्थांच्या निवडणुकांकरीता सभासद संस्थांनी प्रतिनिधी नियुक्तीचे ठराव जिल्हा, तालुका, प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर केलेले असल्यास पुन्हा ठराव मागविण्याची आवश्यकता नाही. तथापि महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १० (४) मध्ये नमुद केलेल्या परिस्थितीत बदल करण्याची मुभा असलेले बदल जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी स्विकारावेत. नवीन अर्हता दिनांकामुळे सभासद संस्था, नव्याने पात्र होत असल्यास अशा संस्थांकडून प्रतिनिधी नियुक्ती ठराव मागविण्याची प्रक्रिया जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावी, असेही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून कळविले आहे.

# आम. सुमनताई पाटील यांचे उपोषण मागे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** आमदार सुमनताई पाटील आणि रोहित पाटील यांनी सरकारने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर मंगळवारी सायंकाळी आमरण उपोषण स्थगित केले. एक महिन्यात जर काम सुरू झले नाही तर पुढचे आंदोलन मंत्रालयासमोर करू असे रोहित पाटील यांनी यावेळी जाहीर केले.



**सांगली : आमरण उपोषण सोडताना आमदार सुमनताई पाटील व रोहित पाटील यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व मान्यवर**

तासगाव-कवठेमहांकाळ तालुक्यातील वंचित गावाच्या शेती व पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी सोमवार पासून सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या घडामोडी, मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. आमदार अनिल बाबर, जिल्हाधिकारी उपोषण सोडताना उपस्थित होते. जेष्ठ स्वातंत्र्यसैनिकाच्या हस्ते सुमनताई पाटील आणि रोहित पाटील यांनी उपोषण सोडले.

# जुन्या पेन्शन साठी दिल्ली येथे राष्ट्रीय ऐतिहासिक आंदोलन !




**आटपाडी : दिल्ली येथे पेन्शन आंदोलनाला उपस्थित आटपाडी येथील शिक्षक बांधव**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** १ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे ऐतिहासिक अशा रामलीला मैदानावर जूनी पेन्शन योजना लागू करा या विशेष मागणीसाठी भव्य असे आंदोलन झाले. या आंदोलनामध्ये कश्मीर ते कन्याकुमारी मधील जनसागर उसळला होता.आंदोलनाचे विशेष आकर्षण म्हणजे प्रत्येक राज्याचे प्रत्येक विभागातील कर्मचारी या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.दिल्ली येथे २ ऑक्टोबर गांधी जयंतीच्या पूर्वी अखंड भारत देशातील कर्मचाऱ्यांनी एक क्रांतीकारी आंदोलन घडवले.क्रांतीकारी नारा म्हणजे छज झएछडक्खजछ तजढए, जो पेन्शन की बात करेगा वही देश पे राज करेगा! या घोषणांनी रामलीला मैदानच नाही तर दिल्ली दणाणून सोडली. जे सरकार आम्हाला पेन्शन देईल त्यांनाच आम्ही मतदान करू अशी खूणगाठ उपस्थीत कर्मचाऱ्यांनी बांधली.

या आंदोलनामुळे केंद्र सरकार हादरले आहे. या ऐतिहासिक आंदोलनासाठी आटपाडी तालुक्यामधील पेन्शन शिलेदारनी सुद्धा सहभाग नोंदवला. यामध्ये नितीन गळवे, दीपक कबीर, जनार्दन मोटे, दत्तात्रय सुतार, विजय चव्हाण, विशाल कवडे, योगेश पुजारी उपस्थीत होते.









# कुवत नसलेली लबाडांची टोळी पाणीप्रश्न कधीच सोडवू शकत नाही : जयकुमार गोरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** कुवत नसलेली लबाडांची टोळी पाणीप्रश्न कधीच सोडवू शकत नाही असे प्रतिपादन आमदार जयकुमार गोरे यांनी केले तर, जयकुमार गोरेंसारख्या कल्पक आणि धडाडीच्या नेतृत्वामुळेच माण आणि खटाव तालुक्यांचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच म्हसवड शहरासाठी ८० कोटींची पाणीयोजना मंजूर झाली आहे. अडचणीत सापडलेल्या बळीराजाला मदत करण्यात आमचे सरकार कायमच तत्पर राहिले आहे. १२ कोटी जनतेला आरोग्य योजनांचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. चाळीस वर्षे सत्तेत असणाऱ्यांनी जनतेचे प्रश्न सोडवले नाहीत. जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी सध्या त्यांचा थापा मारण्याचा उद्योग सुरु आहे. त्यांनी जनतेची लूट केल्याने सत्तेतून बाहेर जावे लागले, आता त्यांचे समूळ उच्चाटन करा असे आवाहन राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

माण-खटाव चे आ. जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातुन म्हसवड शहराच्या ८० कोटींच्या पाणी पुरवठा योजना आणि इतर २२ कोटींच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आ. जयकुमार गोरे, आ.राहुल कुल, सौ.सोनिया गोरे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, मनोजदादा घोरपडे, माजी जि. प. सदस्य अर्जुनतात्या काळे, अरुण गोरे, तालुकाध्य शिवाजीराव शिंदे, धनंजय चव्हाण, दादासाहेब काळे, माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा, विजय धट, नितीन दोशी, सुरेश म्हेत्रे, वैशाली लोखंडे, साधनाताई गुंडगे, धनश्रीदेवी राजेमाने, अकिल काझी, डॉ. वसंत मासाळ, इंजि. सुनिल पोरे, अॅड. भास्करराव गुंडगे, सिध्दार्थ गुंडगे, दत्तोपंत भागवत, गावोगावचे भाजपचे पदाधिकारी आणि महिला भगिनी हजारोंच्या संख्येने उपस्थित होत्या.


म्हसवड येथील पिण्याच्या पाण्याच्या योजनेचे भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. जयकुमार गोरे

### भारतीय जनता पार्टीत इनकमिंग फर्मात

आ. जयकुमार गोरेंच्या अश्वासक आणि विकासात्मक नेतृत्वावर विश्वास ठेवत दादासाहेब माळी, रवी कदम, सुनील शिंदे,शिवाजी माने,विशाल कदम,पंकज शिलवंत यांचेसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पाणीयोजनेच्या भूमिपूजनप्रसंगी आणि व्यासपीठावर नयनरम्य आतषबाजी करण्यात आली. हलगीचा कडकडाट आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

### धो धो पावसात हजारोंच्या जनसमुदायाची उपस्थिती

अत्यंत जिव्हाळ्याच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ८० कोटींच्या योजनेद्वारे सुटल्याचे पहायला हजारोंचा जनसमुदाय पडत्या पावसात उपस्थित होता. दिवसभर गजीनृत्याने कार्यक्रमात रंगत आणली होती. आ. जयकुमार गोरेंसह अनेकांनी ढोल वाजवत ठेका धरला. जलकलश डोक्यावर घेऊन शेकडो महिलांनी शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढली.

राधाकृष्ण विखे पाटील पुढे म्हणाले, केंद्र आणि राज्यसरकारच्या माध्यमातून २०२४ पर्यंत सर्व घरांमध्ये पिण्याचे पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जनतेच्या मनातील सरकार राज्यात आल्याने लोकहिताचे अनेक निर्णय घेतले जात आहेत. एक रुपयात पिकविम्यासह शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत केली जात आहे. भकास आघाडीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री ऑनलाईन होते. दहा कोटी खर्च करुन दहीवडीला शेळी मेंढी संशोधन केंद्र आणि दीड महिन्यात म्हसवड येथे तहसील कार्यालय सुरु करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. खा.रणजितसिं नाईक निंबाळकर म्हणाले, माण , खटावमध्ये गेल्या साठ वर्षात झाला नाही त्यापेक्षा कैक पट अधिक विकास गेल्या बारा वर्षात आ. जयाभाऊंनी करुन दाखवला आहे. बारामती आणि काही फलटणकरांनी आजपर्यंत या भागाला विकासापासून वंचित ठेवण्याचे पाप केले.

आ. जयकुमार गोरे म्हणाले, सिध्दनाथाच्या नगरीतील माता भगिनींना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. पंतप्रधान आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे शहरासाठी ८० कोटींची पाणीयोजना मंजूर करु शकलो. माझ्या तिन्ही निवडणूकांमध्ये म्हसवडकर जनतेने मला भरभरून आशिर्वाद दिले. त्यातून उतराई होण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेत आलो आहे. आमची सत्ता असताना कोट्यवधींचा निधी आणून म्हसवडचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. अनेक विकासकामे मार्गी लावली होती. परिवर्तन झाल्यावर मात्र शहराची अवस्था बकाल झाली आहे. आम्ही आता पाणीयोजनेसह १०२ कोटींच्या निधीतून अनेक कामे साकारत आहोत. छ. शिवाजी महाराज, राजमाता अहिल्यादेवी, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले यांचे पुतळे आणि सुशोभीकरणासाठी कोग्यवधींचा निधी आणला आहे. बारामती आणि फलटणकरांनी टोकाचा विरोध केला तरी संघर्ष करुन या भागात एम मायडिसी मंजूर करुन आणली आहे. २५ हजार जणांना याद्वारे रोजगार उपलब्ध होणार आहे. मतदारसंघातील ९७ गावांमध्ये उरमोडीचे पाणी पोहचले आहे. लवकरच जिहेकठापूरचे पाणी येत आहे. ४४ गावांना टेंभूचे अडिच टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग नुकताच मोकळा झाला आहे. कुवत नसलेली लबाडांची टोळी पाणीप्रश्न कधीच सोडवू शकत नाही असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. कार्यक्रमात आ. राहुल कुल, इंजि. सुनील पोरे, डॉ.मासाळ, विजय धट, रेश्मा कलेढोणे आदिंनी मनोगते व्यक्त केली.

# कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. विदर्भ, मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंप वीज जोडणी यातून पूर्ण करण्यात येईल.

ही योजना २०१८ ते २०२० या वर्षात पूर्ण करावयाची होती. परंतु,मुसळधार पाऊस आणि शेतात उभी पिके असल्याने ट्रान्सफॉर्मर्स (रोहित्र) उभारणीत अडथळा निर्माण झाला. 'कोविड'मुळे देखील या योजनेची प्रगती होऊ शकलेली नाही. उपकेंद्रांच्या कामांसाठी लागणारा वेळ १५ते १८ महिन्यांचा होता. त्यामुळे या योजनेचा मूळ खर्च ५ हजार ४८ कोटी १३ लाख इतक्यावरून ४ हजार ७३४ कोटी ६१ लाख इतका सुधारित करण्यात आला आणि योजनेचा कालावधी मार्च २०२३ पर्यंत वाढविण्यात आला होता. सध्या १ लाख ३८ हजार ७८७ वीज जोडण्यांपैकी २३ कृषी पंप वीज जोडण्या आणि ९३ उपकेंद्रांपैकी ४ उपकेंद्रांची कामे प्रलंबित आहेत. सध्या पावसाळ्यामुळे या उपकेंद्रांची कामे पूर्ण करण्याकरिता योजनेचा कालावधी मार्च २०२४ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

# सोयाबीनवरील रोगाच्या प्रादुर्भावाचे तातडीने पंचनामे करा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक (येलो मोझॅक) हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कृषी विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दिले.

पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे सोयाबीनवर या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. विशेषत: चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशीम, नांदेड या जिल्ह्यांत हा प्रादुर्भाव दिसत असल्याने सोयाबीनचे पीक पिवळे पडत चालले आहे.

नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणे शक्य व्हावे आणि त्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळावा म्हणून प्राधान्याने हे पंचनामे करावेत, असे निर्देश देण्यात आले.

# सेवानिवृत्ती निमित्त बन्सीलाल मांडवे यांचा जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने सत्कार


सांगली : जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी बन्सीलाल मांडवे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करताना जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर व उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी बन्सीलाल मांडवे हे नियतवयोमानानुसार दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आज त्यांचा जिल्हा माहिती कार्यालय येथे जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर यांच्या हस्ते सत्कार करून जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी माहिती अधिकारी एकनाथ पोवार यांच्यासह कार्यालयातील अमोल पाटील, शंकरराव पवार, सुधीर पाटील, सागर दळवी, नागेश वरूडे, प्रदीप थोरात तसेच सेवानिवृत्त कर्मचारी अरूण गाडेकर व अरूण कांबळे उपस्थित होते.

यावेळी श्री. मांडवे यांना सेवानिवृत्तीनंतर त्यांचे जीवन सुखी, आनंदी व निरोगी जावो अशा शुभेच्छा जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर, माहिती अधिकारी एकनाथ पोवार यांच्यासह कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना दिल्या. श्री. मांडवे हे २८ नोव्हेंबर १९९९७ रोजी शासकीय सेवेत जिल्हा माहिती कार्यालय नांदेड येथे वाहन चालक या पदावर रूजू झाले होते. तद्नंतर ते ऑगस्ट २००२ मध्ये बदलीने जिल्हा माहिती कार्यालय सांगली येथे रूजू झाले होते. मे २०१० ते मे २०१२ या कालावधीत त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय कोल्हापूर येथेही सेवा बजावली होती.

# तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविण्यासाठी समाज कल्याण कार्यालयात हेल्पलाईन कक्ष सुरू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** शासनाने व समाज कल्याण आयुक्तालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांची जिल्ह्यातील तृतीयपंथीयांना सविस्तर माहिती देण्यासाठी व त्यांच्या समस्या स्थानिक पातळीवर सोडविण्यासाठी तृतीयपंथीयासाठी हेल्पलाईन कक्ष सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीयांनी या कक्षाशी प्रत्यक्ष अथवा हेल्पलाईन क्रमांकाद्वारे संपर्क साधून शासकीय योजनांची माहिती घ्यावी, समस्या व तक्रारी याबाबत माहिती द्यावी, असे आवाहन समाज कल्याण कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त जयंत चाचरकर यांनी केले आहे.

तृतीयपंथीयांसाठी हेल्पलाईन कक्ष सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सांगली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगांव रोड, सांगली येथे सुरू करण्यात आला आहे. या कक्षाशी संपर्क साधण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक (०२३३) २३७४७३९ आहे.

जिल्हा स्तरावर तृतीयपंथीय व्यक्तींच्या समस्या व तक्रारींचे निवारण करणे, तृतीयपंथीयांसाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती देणे, महाविद्यालयांशी संपर्क साधून तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविणे, संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, तसेच शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करणे व त्याबाबतच्या अडचणी सोडविणे, शिधापत्रिका, मतदान कार्ड व आधार कार्ड काढण्याकामी मदत करणे, केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणी करून तृतीयपंथीयांना ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळवून देणे यासाठी तृतीयपंथीयासाठी हेल्पलाईन कक्ष सुरू करण्यात आला असल्याचे श्री. चाचरकर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# नांदेडच्या शासकीय रुग्णालयातील मृतांचा आकडा ३५ : अशोक चव्हाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


अशोक चव्हाण

**नंदेध :** नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मृतांचा आकडा ३५ वर गेला आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी याबाबतची माहिती दिली. मृतांमध्ये १६ बालकांचा समावेश असल्याची माहितीही चव्हाण यांनी दिली.

अशोक चव्हाण म्हणाले, नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दुर्दैवी घटनेबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ व पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची बैठक झाली. यावेळी आम्ही त्यांना रुग्णालयातील परिस्थितीबाबत विस्तृत माहिती दिली. रुग्णालयाची आरोग्यसेवा प्रभावी करण्यासाठी अनेक तात्कालिक व दीर्घकालीन उपाय सुचवले.

दोन्ही मंत्र्यांनी आमच्या भावना जाणून घेतल्या असून त्यावर लवकरात लवकर योग्य निर्णय घेतील, अशी अपेक्षा आहे. याप्रसंगी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी या रुग्णालयातील बळींची संख्या ३५ वर गेल्याची माहिती दिली. यामध्ये एकूण १६ बालकांचा समावेश आहे, अशी माहिती अशोक चव्हाण यांनी दिली.

# लाखाची लाच घेताना जिल्हा क्रीडा अधिकारी जेरबंद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** ठेकेदाराकडून मंजूर बिलापोटी १५ टक्के कमिशनची एक लाख १० हजार रुपयांची रक्कम लाच स्वरूपात घेणार्या जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर विश्वनाथ साखरे (वय ५२, रा. आई बंगला, राजगृह हौसिंग सोसायटी, विश्रामबाग, सांगली) यांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने मंगळवारी रंगेहाथ जेरबंद केले.

प्रथम श्रेणीतील अधिकारी त्यांच्याच कार्यालयात जेरबंद झाल्याने प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे, साखरे एसीबीच्या जाळ्यात सापडल्याने शिवाजी स्टेडियममधील कार्यालयातून संबंधित अधिकार्यांच्या मर्जीतीलअधिकारी, कर्मचार्यांनी तत्काळ काढता पाय घेतला. पथकाने साखरे यांच्या केबिनसह सांगली (विश्रामबाग) येथील बंगल्याची सायंकाळी झडती घेतली.




